प्रकरण - पाचवे

# उपसंहार

# प्रकरण - पाचवे

# उपसंहार

मराठी साहित्यातील 'कविता' ह्या वाङ्मयप्रकाराचा अनेक विद्वानांनी चिकित्सक अभ्यास करून कवितेचा प्रांत समृद्ध आणि संपन्न करून ठेवला आहे. काळाच्या ओघात कवितेमध्ये अनेक स्थित्यंतरे झाली. १९६० नंतर कवितेला 'ग्रामीण' हे विशेषण लागले आणि कवितेने ग्रामीण जीवनाचा धुंडाळा घेतला. दरम्यानच्या काळात याच ग्रामीण कवितेचे अनेक प्रयोग करायला सुरवात केली. १९८० नंतर आलेलाआणि ग्रामीण कवितेमध्ये प्रभावी ठरलेला 'अभंग आकृतिबंध' हे त्याचेच द्योतक आहे. ग्रामीण कवितेमध्ये आलेला अभंग नेमक्या कोणत्या रूपात, स्वरूपात सादर झाला. याबद्दल कुणीही चिकित्सक दृष्टीने अभ्यास केला नाही. ही उणीव लक्षात घेऊनच 'अभंग आकृतिबंध' यशस्वीरित्या हाताळणारे श्रीकांत देशमुख (बळिवंत) व भगवान ठग (अन्नदात्याची धुळाक्षरे) यांच्या कवितासंग्रहाचा आधार घेऊन अभंग आकृतिबंधाचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. ' 'बळिवंत' व 'अन्नदात्याची धुळाक्षरे' ह्या कवितासंग्रहाचा आकृतिबंधाच्या दृष्टीने अभ्यास' ह्या प्रस्तुत विषयाचा अभ्यास करीत असताना उपरोक्त चार प्रकरणातून जे निष्कर्ष हाती आलेले आहेत त्याची पुनर्मांडणी करून काही महत्त्वपूर्ण विधाने उपसंहारात केली जाणार आहेत. शिवाय लघुप्रबंधाच्या शेवटी संदर्भसूची परिशिष्टात मांडली जाणार आहे. प्रस्तुत प्रकरणाची मांडणी खालीलप्रमाणे केली आहे.

१. आकृतिबंध : संकल्पना व स्वरूप.

२. अन्नदात्याची धुळाक्षरे : आशय व आकृतिबंध.

३. बळिवंत : आशय व आकृतिबंध.

४. ग्रामीण कविता : अभंगातील बदलता आशय आणि लवचिकता.

५. परिशिष्ट - संदर्भसूची.

## १. आकृतिबंध संकल्पना व स्वरूप :-

मराठी साहित्यामध्ये आकृतिबंधाला विशेष महत्त्व आहे. हे महत्त्व ओळखूनच त्याचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. प्रस्तुत प्रकरणांमध्ये आकृतिबंधाची संकल्पना, आकृतिबंधाच्या विविध व्याख्या, आकृतिबंधाचे स्वरूप, मराठी साहित्यातील विविध आकृतिबंध इ. घटकांच्या अनुरोधाने प्रस्तुत प्रकरणाचा बारकाईने अभ्यास केला आहे.

प्रस्तुत प्रकरणाचा अभ्यास करताना आकृतिबंधामध्ये आशय, अभिव्यक्ती आणि आविष्कार या घटकांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. या घटकांशिवाय आकृतिबंधाला परिपूर्णताच येत नाही हे लक्षात येते. आकृतिबंधाची जडणघडण कलावंताच्या अनुभवांवर, मनावर, तो व्यक्त करत असलेल्या आशय-द्रव्यावर अवलंबून असते. म्हणूनच आकृतिबंधाच्या जडणघडणीत कलावंत आणि वाङ्मयप्रकार यांना महत्त्वाचे स्थान आहे. शिवाय आकृतिबंधाला स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी आशय आणि अभिव्यक्तीची फार गरज असते.

आकृतिबंधाचे स्वरूप हे काळानुसार बदलत जाते. तेराव्या शतकामध्ये समाजमनाला जागृत करण्यासाठी ओवी, अभंग, विराणी, गौळणी, भारूड, कीर्तन, प्रवचन, भजन यासारखे छंद निर्माण झाले. तर अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सुनिते, मुक्तछंद, हायकू, अष्टपदी, दशपदी, चारोळी हे वेगवेगळे आकृतिबंध साहित्यात निर्माण झाले. प्रस्तुत प्रकरणाचा अभ्यास करताना शेवटी आकृतिबंध हा गरजेनुरूप जन्माला येतो या निष्कर्षाप्रत यावे लागते.

## २. अन्नदात्याची धुळाक्षरे : आशय व आकृतिबंध :-

१९८० नंतरच्या तिसऱ्या पिढीतील एक अभ्यासू व बहुश्रुत कवी म्हणून भगवान ठगांना ओळखले जाते. १९८० नंतरच्या ग्रामीण कवितेमध्ये आलेल्या अभंगाला प्रगल्भ आणि प्रभावशाली करण्यामध्ये कवी भगवान ठगांचा वाटा महत्त्वपूर्ण आहे. कवी ठगांनी 'अन्नदात्याची धुळाक्षरे' ह्या कवितासंग्रहातून बळिवंताचे दु:ख, वेदना व त्यांच्यापुढील समस्या चित्रीत केल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणाचा अभ्यास करताना कवी ठगांनी आपल्या 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधून वैफल्यग्रस्त अन्नदाता, काळ्या आईचे महत्त्व, बळिराजाचे कष्टमय सोशिक जीवन, निसर्गसंहार, बळिराजाची आशावादी वृत्ती, पावसाचे महत्त्व, संकटग्रस्त बळिराजा, बळिराजाच्या दु:स्थितीला जबाबदार घटक अशा अनेक गोष्टींचा ऊहापोह आपल्या कवितेतून केला आहे.

कवी ठगांनी 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधून बळिवंताचे जीवन रेखाटताना 'अभंग' आकृतिबंधाचा अवलंब केला आहे. त्यांच्या कवितेत आलेला अभंग ग्रामीण-नागरी मिश्रीत बोली, प्रतिमा-प्रतीके, अलंकार, म्हणी, वाक्प्रचार, विविध भाषेतील शब्दांचे मिश्रण इ. गुणांनी संपन्न आहे. कवी ठगांची कविता वाचकाला नुसती अंतर्मुख करत नाही तर विचार प्रवृत्त करते. बळिवंताचे दु:ख हे ठगांच्या प्रत्येक कवितेत केंद्रस्थानी राहिले आहे. बळिराजाच्या दु:खाची गाथा सांगताना कवी ठगांची लेखणी कुठेही आक्रमक, विद्रोही होताना दिसत नाही. ग्रामीण लोकजीवनाला अविष्कृत करताना कवी

ठग अध्यात्म, संतसाहित्य व लोकसाहित्याला स्पर्श करतात. म्हणूनच त्यांची कविता समृद्ध आणि संपन्न होताना दिसते. कवी ठगांनी आपल्या कवितेला अभंगाचा घाट देऊन अभंगाची खंडीत झालेली परंपरा पुनर्जीवित केली आहे.

## ३. बळिवंत : आशय व आकृतिबंध :-

कवी श्रीकांत देशमुख यांची १९८० नंतरच्या तिसऱ्या पिढीतील 'अभंग आकृतिबंध' यशस्वीपणे हाताळणारे कवी म्हणून साहित्य विश्वात ओळख आहे. कवी देशमुखांना शेतीविषयी, शेतकऱ्यांविषयी आणि आपल्या परिसराविषयी खूप जिव्हाळा आहे. म्हणूनच कवी देशमुखांच्या 'बळिवंत' मध्ये समग्र कृषिव्यवस्था केंद्रस्थानी राहिली आहे. प्रस्तुत प्रकरणाचा अभ्यास करताना कवी देशमुखांनी 'बळिवंत' मधून समग्र कृषिव्यवस्थेला अभंगातून अविष्कृत केले आहे. 'बळिवंत' मधून शेतकरी बापाची अनेकविध रूपे, शेतकऱ्याचे दु:ख, वेदना, गावापासून तुटलेपणाची जाणीव, कृषिजनसमुहातील स्त्रीच्या वाट्याला आलेले जगणे, पावसाचे महत्त्व, सांस्कृतिक संचिताचा आविष्कार, शेतकऱ्यांच्या इच्छा, आशा, आकांक्षा, पशू, पक्षी, प्राणी यांचा आविष्कार घडविला आहे.

कवी देशमुखांनी 'बळिवंत' मधून समग्र कृषिव्यवस्थेला साकारताना अभंग आकृतिबंधाचा अवलंब केला आहे. त्यांच्या कवितेतील अभंग ग्रामीण जीवनातील दु:ख आर्ततेने व्यक्त करतो. संतसाहित्याला, लोकसाहित्याला स्पर्श करतो. कवी देशमुखांच्या कवितेतील अभंग अस्सल ग्रामीण शब्दांनी, प्रतिमा प्रतीकांनी, अलंकारांनी वाक्प्रचारसदृश्य रचनेने सर्वगुणसंपन्न आहे.

कवी देशमुखांची कविता वाचकाला नुसती विचारप्रवृत्त करत नाही तर चिंतनशील बनविते. कवी देशमुख बदलत्या खेड्याचा वेध घेताना संयमी भूमिका घेतात. त्यांच्या प्रत्येक कवितेत बळिराजाचे दु:ख केंद्रस्थानी राहिले आहे. कवी देशमुख आपल्या कवितेतून पशू, पक्षी, प्राणी यांच्या जीवनाला अधोरेखीत करून कवितेत जिवंतपणा आणतात. त्यांच्या कवितेतील प्रतिमा-प्रतीकांतून व्यक्त झालेला अर्थ विकासाच्या दृष्टिकोनातून प्रतीत झाला आहे. कवी देशमुखांच्या ठिकाणी जीवन आकलनाचे ठोस विचारविश्व असल्यामुळेच ते समग्र कृषिव्यवस्थेला साकार करू शकले. याचा प्रत्यय त्यांच्या अभंगरूपी कवितेतून येतो.

## ४. ग्रामीण कविता : अभंगातील बदलता आशय आणि लवचिकता :-

ग्रामीण कवितेमध्ये अभंगाचा घाट १९८० नंतरच्या इंद्रजित भालेराव, राजन गवस, विठ्ठल वाघ, नारायण सुमंत, सोपान हाळमकर, प्रकाश होळकर, श्रीकांत देशमुख, भगवान ठग इ. कवींनी

यशस्वीरित्या हाताळला आहे. या अगोदरही कवी केशवसुत, गोविंदाग्रज, मर्ढेकर, बहिणाबाई, महानोर यांनी अभंगाचा घाट स्वीकारला आहे. प्रस्तुत प्रकरणात अभंगातील आशय काळानुरूप कसा बदलत जातो. शिवाय अभंगाच्या अंगी असलेल्या 'लवचिकता' या गुणामुळे त्याचा कोणत्याही कालखंडात सहज वापर करता येतो. याचे उदाहरण म्हणून 'बळिवंत' आणि 'अन्नदात्याची धुळाक्षरे' ह्या कलाकृतींकडे पाहता येईल.

प्रस्तुत प्रकरणात अभंगातील बदलता आशय शेतकरी जीवन, सामाजिक जीवन, कृषिव्यवस्था, सांस्कृतिक जीवन या अनुरोधाने व्यक्त केला आहे. तर ग्रामीण कवितेत आलेल्या अभंगातील 'लवचिकता' शब्दयोजना, चरणयोजना आणि आशयोजनेच्या दृष्टीने व्यक्त केली आहे.

प्रस्तुत प्रकरणाचा अभ्यास करत असताना अभंगाचा आशय काळानुरूप बदलत जातो. १९८० पूर्वी निर्माण झालेला अभंग आणि १९८० नंतर निर्माण झालेला अभंग ग्रामीण जीवनाच्या उद्धारासाठी आणि ग्रामीण जीवन मांडण्यासाठीच निर्माण झाला आहे. पारंपरिक अभंग आणि ग्रामीण कवितेतील अभंग यांच्यात साधर्म्य दिसून येते. शिवाय ग्रामीण कवितेतील आशयात अभंगामुळे वैविध्यपूर्णता आली आहे. याचा प्रत्यय येतो.

'बळिवंत' व 'अन्नदात्याची धुळाक्षरे' ह्या कवितासंग्रहांचा आकृतिबंधाच्या दृष्टीने अभ्यास' ह्या संशोधन विषयाचा अभ्यास करत असताना विविध हस्तलिखिते, मासिके, नियतकालिके, साहित्यातील विविध समीक्षात्मक ग्रंथ यांचा आधार घेतला आहे. प्रस्तुत विषयाचे संशोधन 'ग्रंथकेंद्रित संशोधन' या संशोधन पद्धतीनुसार केले आहे. 'ग्रंथकेंद्रित संशोधन' असल्यामुळे अवलोकन, वर्गीकरण, गृहीतकृत्य, पुन:परिक्षण, मूल्यमापन अशा वाङ्मयीन वस्तुनिष्ठ पद्धतीचा अवलंब करून संशोधन पूर्ण केले आहे.

-----x-----